नि.दि.दा.क्र.३३/२०१४
मारोती विरुद्ध सोमा
निशाणी – ६८

**वादी तर्फे साक्षीदार क्रमांक ०२ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की –
माझे नाव: निलेश डोमाजी रायपुरे,
वयः ३५ वर्षे, व्यवसायः भूकरमापक,
निवासस्थान: उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय, चंद्रपूर, ता. व जि. चंद्रपूर.

**शपथेवर सरतपासणी वादीतर्फे श्री. एम. झेड. लांबट वकील यांच्यामार्फत**

आज न्यायालयात साक्ष देण्याकरिता मला न्यायालयाचा साक्ष समंस प्राप्त झालेला आहे. सन २०१९ मध्ये न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे माझी कोर्ट कमिशनर म्हणून नियुक्ती झाली होती. त्यानुसार मी मौजा नेरी येथे सिटी सर्वे क्र.३९१ व ३९३ यांची संयुक्त मोजणी केली होती. सिटी सर्वे क्र.३९२ मध्ये कोणाचा ताबा आहे हे आम्हाला कळवायचे होते. आखीव पत्रीकेप्रमाणे सिटी सर्वे क्र.३९२ ही सामाईक गल्ली आहे.

०२. आदेश प्राप्त झाल्यानंतर मी अर्जदार सोमा नन्नावरे यांच्याकडुन अर्ज भरून घेतला होता. त्यानंतर मोजणीची नोटीस मी भास्कर नन्नावरे, ग्रामपंचायत, मीराबाई वाघमारे, संभा मड्डु खाटे, गुलाब कामडी, दिवाकर नन्नावरे, विठ्ठल कृष्णाजी गजभिये, मारोती खाटे, राधा गोमा नन्नावरे व मोतीराम मधु खाटे यांना तामिल केली होती. त्यापैकी मोजणीच्या वेळी सोमा नन्नावरे, मारोती खाटे, तुळसाबाई गजभे, विलास खाटे, दिवाकर नन्नावरे, मीराबाई वाघमारे, सिताराम नन्नावरे व गुलाब कामडी हे उपस्थित होते.

०३. मी दिनांक ११.०३.२०१९ रोजी मोजणी केली होती. मी वादी व प्रतिवादी यांनी दाखविलेल्या ताबा वहिवाटीप्रमाणे मोजणी काम केले होते. मी प्लेन टेबल पध्दतीने मोजणी केली होती. मी एकुण ०८ टेबल मोजणी करताना घेतले होते. मोजणी अंती मला आढळून आले होते की, सिटी सर्वे क्र.३९१ च्या धारकाची सिटी सर्वे क्र.३९२ मध्ये ०८.४ चौ.मी. जागेवर ताबा व वहिवाट आहे. सदरची जागा मी हिरव्या रंगांनी दाखविली आहे. मोजणीनंतर मी न्यायालयामध्ये क प्रत व अहवाल सादर केला होता. आता मला

अभिलेखावरील नि.क्र.५७ वरील क प्रत दाखविण्यात आली. सदरची क प्रत मी न्यायालयात आणलेल्या अ प्रतीवरुन पडताळले असता बरोबर आहे.

**प्रतिवादी व त्यांचे विधिज्ञ वारंवार पुकारा करुन सुध्दा गैरहजर म्हणून उलटतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत
माझ्या समक्ष

ठिकाण – चिमूर
दिनांक १३/०८/२०२५

(आर. डी. भुयारकर)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, चिमूर